RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal
UGC-CARE LISTED

Special Issue, Volume- IV

## Challenges of Higher Education in India to Compete with Global Level

July 2021






**Chief Editor:**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor:**
**Dr. Purandhar Dhanapal Nare**
**Principal,**
**Night College of Arts and Commerce,**
**Ichalkaranji**

**Co-Editor:**
**Dr. Madhav. R. Mundkar**





Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur
Dist. Pune 412 208

| | | |
|---|---|---|
| 43 | मराठी कादंबरीतील जोगतीणींचे चित्रण<br>प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते, श्री. सौरभ रमेश पाटणकर | 144-146 |
| 44 | स्त्रीत्ववाद ः इतिहास लिखाणातील एक नविन प्रवाह<br>डॉ रामेश्वर विक्रम सपकाळ | 147-149 |
| 45 | तुम्हें बदलना ही होगा' उपन्यास में दलित विमर्श<br>प्रा.डॉ.संगीता विष्णु भोसले | 150-152 |
| 46 | व्हॉलीबॉल खेळाडूंच्या समन्वय घटकावर योग प्रशिक्षणाचा होणारा परिणाम<br>प्रा. दिपक प्रकाश सौदागर | 153-154 |
| 47 | नाशिक जिल्हयातील भूमी उपयोनाचा भौगोलिक अभ्यास<br>आहिरे बायाजी मोतीराम, प्रा. डॉ. राजपंगे माधव गणपती | 155-159 |
| 48 | भारताच्या जडणघडणीत मौलाना आझाद यांचे योगदान<br>डॉ. दत्तात्रय चंद्रकांत वाबळे | 160-162 |
| 49 | जळगाव जिल्हयातील लोकसंख्या पोषण स्थिती एक भौगोलिक अभ्यास<br>डॉ. विशाल वाघ, डॉ. महंमद शेख | 163-165 |
| 50 | ज्योती जैन के साहित्य में चित्रित विविध समस्याएँ<br>इरफान बाळासो नायकवडे | 166-168 |
| 51 | भारतीय समाजातील स्त्री - भ्रूण हत्या<br>प्रा.डॉ.योगेश जगन्नाथ कोरडे. | 169-172 |
| 52 | औसा तालुक्यातील भूजल पातळीचा भौगोलिक अभ्यास<br>प्रा. जावळे व्ही. जी. | 173-175 |
| 53 | खो–खो खेळाचा आंतरराष्ट्रीय प्रवास<br>डॉ. देवेंद्र बापुसो बिरनाळे | 176-177 |
| 54 | १८ व्या अशिया कबड्डी स्पर्धेमध्ये दक्षिन कोरिया संघाने वापरलेल्या कौशल्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास<br>Dr.Yevan Awale | 178-180 |
| 55 | विजन – शहरी उच्च वर्गीय नारी की दास्तान<br>डॉ. सबिहा समिरूद्दीन सय्यद | 181-182 |
| 56 | वैश्विक परिप्रेक्ष में उच्च शिक्षा की चुनौतियाँ<br>डॉ. श्रीकांत बी. संगम | 183-184 |
| 57 | वंजारा कवींचे निसर्गचित्रण<br>चव्हाण लक्ष्मण भैरू | 185-192 |
| 58 | 21 वीं सदी की कवयित्रियों के काव्य में स्त्री विमर्श<br>डॉ. शाहू साईनाथ गणपत | 193-196 |
| 59 | किसानों की आत्महत्या पर केंद्रित कहानी "हत्या": एक अनुशीलन<br>डॉ. काळे लक्ष्मण तुळशीराम | 197-200 |
| 60 | उमेदवाराच्या राजकीय गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबत मतदारांमधील समज व त्याचा निवडणुकीच्या निकालावर प्रभाव (गोंदिया तालुक्याच्या विशेष संदर्भात)<br>प्रा.डॉ. शशिकांत जे. चवरे | 201-207 |
| 61 | औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण साक्षरतेचे भौगोलिक विश्लेषण<br>डॉ. प्रवीण विलासराव ठाकरे | 208-210 |




Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur
Dist. Pune-412 208

S.S.Dhamdhere ... Commerce College
तमसो मा ज्योतिर्गमय

Scanned with CamScanner

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, July 2021, Special Issue, Volume-IV
"Challenges of Higher Education in India to Compete with Global Level"

# भारताच्या जडणघडणीत मौलाना आझाद यांचे योगदान

डॉ. दत्तात्रय चंद्रकांत वाबळे,
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख, साहेबराव शंकरराव धमढेरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर, जि. पुणे.
ईमेल dcwabale@gmal.com

**गोषवारा :-**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत व स्वातंत्र्योत्तर जडणघडणीत अल्पसंख्यांक नेत्यांनी महत्वाची भूमिका बजावली. त्यामध्ये मौलाना आझाद यांचे स्थान सर्वात वरचे आहे. त्यांचा जन्म कट्टर धर्मवादी कुटुंबात झाला असला तरी विविध भाषांमधीत साहित्य, मुस्लिम राष्ट्रांधील राष्ट्रवादी चळवळी आणि महात्मा गांधी यांच्या प्रभावामुळे त्यांचा प्रवास कट्टर धर्मवादी ते राष्ट्रवादी, धर्मनिरपेक्षतावादी, आधुनिक उदारमतवादी असा झाला. त्यांनी अल्-हिलाल व अल्-बिघाल या उर्दू साप्ताहिकांद्वारे मुस्लिम समाजाचे प्रबोधन करून त्यांच्यात स्वातंत्र्य व राष्ट्रवादाची चेतना निर्माण केली. गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. ब्रिटिशांविरुद्ध आक्रमक भूमिका घेत स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. राष्ट्रिय कॉंग्रेसचे नेते व अध्यक्ष म्हणून काम करीत असतानाच हिंदू-मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार केला. मुस्लिम लिगच्या द्विराष्ट्रवादाच्या भूमिकेला विरोध केला. भारताचे ऐक्य व अखंडत्व कायम ठेवण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न केला. मौलाना आझाद यांनी स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री म्हणून देशाचे शिक्षण विषयक धोरण आखण्यात महत्वाची भूमिका बजावली. शिक्षणाचे समान धोरण व प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी शिक्षण विभागाच्या माध्यमातून सक्तीचे व मोफत शिक्षण, शिक्षणाचे सार्वत्रिकरण आणि केंद्र व राज्यांमध्ये समान शैक्षणिक धोरण यादद्वारे सामान्यांना शिक्षणाचे दालन खुले करण्यात पुढाकार घेतला. त्यामुळे भारतात शैक्षणिक चळवळ उभी राहिली. विद्यापीठे ही शैक्षणिक व सामाजिक विकासाची केंद्रे बनावीत यासाठी उच्च व तंत्र शिक्षणाच्या विकासाला पाठबळ दिले. देशाच्या शैक्षणिक, आर्थिक व औद्योगीक विकासाबाबतच्या पंडीत नेहरूंच्या धोरणांना त्यांनी पाठबळ दिले. तसेच लोकशाही, धर्मनिरपेक्षता या तत्वांचा अंगीकार करतानाच सर्वसमावेशक व विकासात्मक दृष्टिकोन स्विकारला.

**प्रस्तावना :-**

धर्माच्या आधारे भारताची फाळणी झाली. मात्र त्यास मौलाना आझाद यांनी ठाम विरोध केला. स्वातंत्र्य चळवळीत मुस्लिम समाजात जहाल आणि मवाळ असे गट होते. जहाल गट इंग्रजी सत्तेचा कट्टर विरोधक आणि सामाजिक सुधारणांबाबत प्रतिगामी होता. मवाळ गट पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा व आधुनिक विचारांचा पुरस्कार करणारा, ब्रिटीश सत्तेचा समर्थक होता. मौलाना आझाद यांची भूमिका दोन्ही गटांपेक्षा वेगळी होती. त्यांचा ब्रिटीश साम्राज्यवास कडवा विरोध होता. तसेच पाश्चात्य शिक्षण पद्धती, उदारमतवाद, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता या तत्वांचा त्यांनी स्विकार केला. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत व स्वातंत्र्योत्तर भारताच्या विकासात महत्वाची भूमिका बजावली. या संशोधन पेपरमध्ये मौलाना आझाद यांचे स्वातंत्र्य चळवळीत व स्वातंत्र्योत्तर भारताच्या विकासातील योगदानाची चिकित्सा केली आहे.

**गृहितके :-**

१. मौलाना आझाद यांच्यावर पडलेल्या वैचारीक प्रभावाचा आढावा घेणे.
२. मोलाना आझाद यांनी मुस्लिम समाजाच्या प्रबोधनासाठी केलेल्या कार्याची चिकित्सा करणे.
३. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत मौलाना आझाद यांनी केलेल्या कार्याची चर्चा करणे.
४. स्वतंत्र भारताच्या जडणघडणीत मौलाना आझाद यांच्या योगदानाची चर्चा करणे.

**मौलाना आझादांवर पडलेला प्रभाव :-**

मौलाना आझादांचा जन्म ११ नोव्हेंबर १८८८ रोजी एका प्रतिष्ठित धर्मपंडित घराण्यात मक्केला झाला. त्याचे वडील धर्मगुरू होते. त्यांच्या घरातील वातावरण कर्मठ व सनातनी होते. त्यांना घरातच धार्मिक स्वरूपाचे शिक्षण मिळाले. त्यामुळे आझादांवर कुटुंबामध्ये धार्मिक विचारांचा प्रभाव पडला. त्यांना उच्च दर्जाची बुद्धिमत्ता व तीव्र स्मरणशक्ती लाभली होती. त्यामुळे त्यांनी वयाच्या १६ व्या वर्षी अरबी, फारशी, उर्दू, हिंदी आणि इंग्रजी भाषेत प्राविण्य मिळविले. इंग्रजी व अन्य भाषांतील साहित्य वाचनामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. ते १९०८ मध्ये इराक, सिरिया, तुर्कस्थान, इजिप्त या इस्लामीक देशात गेले. त्यांनी तेथील स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांशी चर्चा केली. त्यावेळी त्यांच्यावर राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव पडला. १९२० मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य चळवळीने ते प्रभावीत झाले. एकूणच मौलाना आझाद यांच्यावर वेगवेगळ्या टप्यावर धार्मिक विचार, विविध भाषांमधील साहित्य, इस्लामीक राष्ट्रातील राष्टवाद, स्वातंत्र्य चळवळ यांचा प्रभाव पडला. त्यामुळे कट्टर धर्मवादी ते राष्ट्रवादी, धर्मनिरपेक्षवादी, आधुनिक उदारमतवादी असा त्यांचा वैचारीक प्रवास झाला.

**स्वातंत्र्य चळवळीतील योगदान :-**

मौलाना आझाद इस्लामिक राष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीने प्रभावीत झाले होते. त्यांनी भारतात आल्यावर बंगाल प्रांतात अरविंद घोष आणि श्यामसुंदर चक्रवर्ती यांच्या बरोबर स्वातंत्र्य चळवळीत प्रथम भाग घेतला. त्यांनी मुंबई आणि दक्षिण भारतातील ब्रिटीश विरोधी चळवळीला मदत केली. तसेच त्यांनी स्वातंत्र्य चळवळीला विरोध करून ब्रिटीशांना सहकार्य करणाऱ्या मुस्लिम समाजास ब्रिटीशांविरुद्ध लढण्यास प्रवृत्त केले.

मौलाना आझाद यांनी १९१२ मध्ये अल् हिलाल हे उर्दू भाषिक साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाद्वारे त्यांनी मुस्लिम समाजात स्वातंत्र्य आणि राष्ट्रवादाची नवी चेतना निर्माण केली. त्यांनी आपल्या लिखाणातून आणि भाषणातून स्वातंत्र्य चळवळीच्या विरोधी भूमिका घेणाऱ्या नेत्यांची भूमिका कशी चूकीची आहे, हे पटवून दिले. ब्रिटीशांवर प्रखर टिका केल्याने सरकारने अल् हिलाल या साप्ताहिकावर बंदी घातली. त्यामुळे आझादांनी अल्-बिलाघ हे दुसरे साप्ताहिक सुरू केले. आझादांच्या ब्रिटिश विरोधी आक्रमक प्रचारामुळे त्यांना बंगाल प्रांत सोडावा लागला. तसेच त्यांना पंजाब, उत्तर प्रदेश, मद्रास या प्रांतातही प्रवेश बंदी केली. त्यानंतर त्यांनी बिहारमध्ये राहून आपले कार्य केले.

मौलाना आझाद यांनी १९२० साली प्रत्यक्ष स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य लढ्यास प्राप्त झालेले जन आंदोलनाचे स्वरूप पाहून ते प्रभावीत झाले. त्यामुळे त्यांनी गांधीजींच्या नेतृत्वाखाली आंदोलनात सहभाग घेतला. तसेच त्यांनी खिलाफत चळवळीला पाठींबा दिला. ब्रिटीशांविरूद्ध आक्रमक भूमिका घेत स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व



S.S.Dhamdhere Arts & Commerce College · तमसो मा ज्योतिर्गमय
Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur
Dist Pune-412 208
Scanned with CamScanner

केले. त्यामुळे त्यांना एक वर्षाची शिक्षा झाली. त्यानंतर ते काँग्रसचे महत्वाचे नेते बनले. १९२३ साली त्यांची राष्ट्रिय काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली. १९२९ साली काँग्रेस अंतर्गत स्थापन झालेल्या राष्ट्रिय मुस्लिम पक्ष या गटाचे ते संस्थापक अध्यक्ष होते. १९३० साली सुरू झालेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्याबद्दल त्यांना दीड वर्षाचा कारावास भोगावा लागला होता.

मौलाना आझाद सुरूवातीपासूनच हिंदू-मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते होते. ब्रिटीश पूर्व काळात भारतात धर्मांध शक्ती विरूद्ध संघर्ष झाला. मात्र भारतातील हिंदू आणि मुस्लिम यांच्यात धर्माच्या आधारे संघर्ष झाला नाही. ब्रिटीशांनी भारतात फोडा आणि राज्य करा या नितीचा अवलंब करीत हिंदू व मुस्लिम समाजात फूट पाडली. ब्रिटीशांच्या या नितीस बळी न पडता सर्व धर्मीय भारतीयांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभागी व्हावे, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. ब्रिटीशांनी १९३२ साली जातीय निवाड्याद्वारे मुस्लिम व इतर अल्पसंख्यांकांना विधीमंडळात राखीव जागा आणि राखीव मतदार संघ जाहिर केले. याद्वारे ब्रिटिशांनी भारतात धर्माच्या आधारे फूट पाडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मौलाना आझादांनी हा निवाडा रद्द करण्याची मागणी केली.

ब्रिटिशांनी भारतात धर्माच्या आधारे स्वतंत्र पाकिस्तान राज्याच्या निर्मितीला खतपाणी घातले. ब्रिटिशांची ही भूमिका मौलाना आझादांना मान्या नव्हती. म्हणून त्यांनी भारताच्या फाळणीस विरोध केला. त्यांच्या मते, पाकिस्तानची निर्मिती भारतासाठी घातक तर मुस्लिमांसाठी अधिक अपायकारक आहे. फाळणीमुळे मुस्लिम समाजाचे प्रश्न सुटण्याऐवजी अधिक वाढतील. म्हणून त्यांनी धर्माच्या आधारावरील व्दिराष्ट्रवादास विरोध केला.

१९४० ते १९४६ या काळात मौलाना आझाद राष्ट्रिय काँग्रसचे अध्यक्ष होते. हा काळ स्वातंत्र्य आंदोलनात सर्वात संघर्षाचा काळ होता. भारताची फाळणी करून पाकिस्तानची निर्मिती करणे हे मुस्लिम लीगचे ध्येय होते. तर भारताचे अखंडत्व कायम ठेवून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी काँग्रेस प्रयत्नशील होती. या संघर्षाच्या काळात विशेषत: १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाच्या काळात त्यांनी काँग्रसचे नेतृत्व केले. तसेच त्यांनी १९४५ साली मुस्लिम लीग आणि काँग्रेस यांच्यात समझोता घडवून आणण्यात पुढाकार घेतला. १९४६ साली कॅबिनेट मिशन समोर त्यांनी पाकिस्तानच्या मागणीला विरोध केला. एकूणच स्वातंत्र्य चळवळीच्या काळात मौलाना आझाद यांनी फाळणी टाळण्याचा आणि देशाचे अखंडत्व टिकविण्याचा अखेरपर्यंत प्रयत्न केला. त्यांच्या मते पाकिस्तानच्या निर्मितीमुळे कोणताही प्रश्न सुटणार नाही. उलट या दोन शेजारील देशांमध्ये शत्रुत्व निर्माण होईल. त्यांनी इंडिया विन्स फ्रिडम या पुस्तकात आपली फाळणी विषयक भूमिका स्पष्ट केली आहे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील योगदान :-**

मौलाना आझाद हे स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण मंत्री होते. त्यांनी १९४७ ते १९५८ अशी सलग ११ वर्षे शिक्षणमंत्री म्हणून काम केले. स्वतंत्र भारताचे शिक्षण विषयक धोरण आखण्यात त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. त्यांनी नेतृत्वाखालील शिक्षण विषयक समितीने केलेल्या शिफारशीमुळे भारतातील शैक्षणिक धोरणाचा पाया घातला. केंद्र व राज्य पातळीवर शिक्षणाचे समान धोरण स्विकारून त्यांनी प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यास प्राधान्य दिले. ग्रामीण भागातील सामान्य मानसाला मातृभाषेतून शिकण्याची संधी मिळाली. १४ वर्षाखालील मुला-मुलींना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देणारे धोरण आखले. त्यांनी प्रौढ शिक्षण, प्राथमिक शिक्षण, कृषी शिक्षण, उच्च आणि तंत्र शिक्षणाचे धोरण निश्चित करून सर्वांना शिक्षणाचे दालन खुले केले. त्यामुळे भारतात शैक्षणिक चळवळ उभी राहिली.

मौलाना आझादांच्या शिक्षण विषयक सकारात्मक भूमिकेमुळे भारताच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासाला चालना मिळाली. त्यासाठी त्यांनी संगीत नाटक अकॅडमी, साहित्य अकॅडमी, ललितकला अकॅडमी यासारख्या संस्था स्थापन केल्या. तसेच भारतातील विद्यापीठांमध्ये समन्वय साधण्यासाठी आणि त्यांच्या मदतीसाठी, त्यांच्यात एकसमान धोरण ठेवण्यासाठी विद्यापीठ अनुदाने आयोगाची स्थापना केली. त्याद्वारे विद्यापीठे ही शैक्षणिक विकासाबरोबरच सामाजिक विकासाची केंद्र बनविण्यासाठी प्रयत्न केले. उच्च शिक्षणाबरोबरच तंत्रशिक्षणाच्या विकासाला प्रोत्साहन दिले. त्यांनी आयआयटी सारख्या तंत्रशिक्षण संस्था निर्माण करून त्यास पाठबळ दिले. आज भारताने उच्च आणि तंत्र शिक्षण क्षेत्रात मोठी भरारी मारली आहे. त्याचा पाया मौलाना आझादांनी घातल्याचे दिसून येते.

मौलाना आझादांनी पंडित नेहरूंच्या धोरणांना सतत पाठिंबा दिला. भारताचे संमिश्र आर्थिक व औद्योगिक विकासाचे धोरण राबविण्यासाठी पंडीत नेहरूंना भक्कम पाठबळ दिले. एकूणच भारताच्या सर्वांगीन विकासासाठी त्यांनी विविध क्षेत्रात महत्वाची भूमिका बजावली. त्यांनी लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष तत्वांचा अंगीकार केला. सर्वसमावेशक आणि विकासात्मक दृष्टिकोन स्विकारला. त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील आणि स्वातंत्र्योत्तर काळातील कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारने १९९२ साली त्यांना मरणोत्तर भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानीत केले. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून ११ नोव्हेंबर हा त्यांचा जन्मदिवस राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो. तसेच त्यांच्या नावाने भारतात अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्था स्थापन झाल्या आहेत. त्यांच्या नावाने अनेक पुरस्कार दिले जातात. यावरून त्यांचे भारताच्या जडणघडणीतील योगदान स्पष्ट होते.

**निष्कर्ष :-**

१. मौलाना आझाद यांचा जन्म धर्मपंडीत घराण्यात झाला असला तरी त्यांच्यावर विविध भाषांमधील साहित्य, इस्लामीक राष्ट्रातील राष्ट्रवाद आणि महात्मा गांधीच्या नेतृत्वाचा प्रभाव पडला. त्यामुळे त्यांचा कट्टर धर्मवादी ते राष्ट्रवादी, धर्मनिरपेक्षवादी, आधुनिक उदारमतवादी असा वैचारीक प्रवास झाला.

२. मौलाना आझाद यांनी मुस्लिम समाजाला स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होण्यासाठी प्रेरीत केले. अल-हिलाल व अल-बिलाग या साप्ताहिकांच्या माध्यमातून त्यांनी मुस्लिम समाजात स्वातंत्र्य आणि राष्ट्रवादाची भावना जागृत केली.

३. मौलाना आझाद यांनी स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला, राष्ट्रीय काँग्रेसचे व चळवळीचे नेतृत्व केले.

४. मौलाना आझाद यांनी व्दिराष्ट्रवादाला विरोध करून हिंदू व मुस्लिम समाजात ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांनी धर्मनिरपेक्ष तत्वाचा अंगीकार केला.

५. धर्माच्या आधारे फाळणी झाल्यास भारत आणि पाकिस्तान यांच्यात कायमचे शत्रुत्व निर्माण होईल ही आझादांनी व्यक्त केलेली भिती आज खरी ठरली आहे. यावरून ते काळाच्या पुढे असल्याचे दिसून येते.



S.S. Dhamdhere Arts & Commerce College
तमसो मा ज्योतिर्गमय
Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur
Dist Pune-412 208

६. मौलाना आझाद यांनी स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री म्हणून ११ वर्षे काम केले. त्यावेळी त्यांनी प्रौढ शिक्षण, प्राथमीक शिक्षण, कृषी शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षणाचे धोरण स्विकारून सर्वसामान्यांना शिक्षण उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे भारतात शैक्षणिक चळवळ उभी राहिली.

७. मौलाना आझाद यांनी लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि उदारमतवाद या मूल्यांच्या प्रचार व प्रसारासाठी केलेले कार्य आजच्या काळात प्रेरणा देणारे आहे.

संदर्भसूची :-

1- Varma, V. P., Modern Indian Political Thoughts, Lakshmi Narain Agarwal Educationnal Publications, Agra.
२. बाचल, वि. मा. व इतर, २००२, भारतीय राजकीय विचारवंत, के सागर पब्लिकेशन, पुणे.
३. भोळे, भा. ल., २००३, आधुनिक भारतीतील राजकीय विचार, पिंपळापुरे आणि कं. पब्लिशर्स, नागपूर.
४. शहा, जी. बी. व बी. एन पाटील, २००८, आधुनिक भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
५. भृंगारपुरे, अरविंद, २००६, समग्र भारतीय व पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, विद्या प्रकाशन नागपूर.

तमसो मा ज्योतिर्गमय
S.S.Dhamdhere Arts & Commerce College

Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur
Dist Pune-412 208



Scanned with CamScanner